Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
**ISSN:-2230-7850**

Available on all social networks

ORIGINAL ARTICLE

# *बडोदा संस्थानचे महाराजा श्रीमंत सयाजीराव महाराज तृतिय यांच्या शैक्षणिक योगदानाचा विश्लेषणात्मक इतिहास*

*सुनीता सरायकर*

वसंतराव नाईक शासकीय कला
व समाजविज्ञान संस्था, नागपूर.,

## *सारांश :*

हिंदूस्थानचा इतिहास घडविण्याचे श्रेय ज्या थोडया व्यक्तींना जाते त्यात बडोद्याचे शासक श्री. सयाजीराव गायकवाड तृतीय यांचा प्रामुख्याने अंतर्भाव केला जातो. महाराज जरी बडोदा संस्थानचे राजे असले तरी त्यांचे कार्य व विचार स्वतःच्या राज्या व्यतिरिक्त भारतात व भारताबाहेरील युरोप, अमेरिका या सारख्या मोठया भूभागावर पसरले होते. राजकारणी पुरूषाला आवश्यक असणारी सखोल व चौफेर बुध्दिमत्तेची देणगी सयाजीरावांना प्राप्त झाली होती. त्यामुळेच त्यांनी बडोदा संस्थानास क्रमांक एकचे स्थान प्राप्त करून दिले.

### *प्रस्तावनाः*

सयाजीराव उदारमतवादी, लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते, पुरोगामी वृत्तीचे, सुधारक विचारांचे राजा होते. सयाजीरावांनी बडोद्यात सक्तीचे मोफत शिक्षण, अस्पृश्य व आदिवासींच्या शिक्षणाची सोय, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, गावपातळीवर ग्रामपंचायत, गाव तेथे वाचनालय, आधुनिक शेती प्रयोगाची सुरवात, बालविवाह बंदी कायदा, पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, सहकारी पतपेढयांसाठी कायदे, इ. अनेक नवीन परंपरा त्यांनी सूरू केल्या. कलेचे व कलाकारांचे, विद्वानांचे ते आश्रयदाते होते.

मराठी राज्य संस्थापक छत्रपति शिवाजी महाराज यांनी इ.स. 1664 साली सुरतेवर स्वारी केली हाच मराठयांचा गुजराथशी आलो पहिला संबंध होय. यानंतर इ.स. 1670 साली मराठयांनी पुन्हा सूरतेवर आक्रमण केले. इ.स. 1772 साली सुरतेच्या दक्षिणेस असलेले पारनेरा व बागलाण हे किल्ले त्यांनी घेतले. पुढे सेनापती मोरो त्रिंबक पिंगळे यांनी बागलाणमधील मोठा किल्ला काबीज केला. हा किल्ला गुजराथेतून दक्षिणेत येणाऱ्या मुख्य रस्त्यावर असल्याने मराठयांना या किल्ल्याच्या साहाय्याने गुजराथवर आपला दाब ठेवता येवू लागला. पुढील काळात हंबीरराव मोहिते यांनी 1675 साली भडोच जिल्हयापर्यंत मराठयांचा प्रभाव निर्माण केला. इ.स. 1699 साली सातारचे छत्रपति राजाराम महाराज यांनी आपले सेनापती खंडेराव दाभाडे यास बागलाणमध्ये चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यासाठी पाठविले. त्यांनी सुरतपर्यंत वसुलीची मजल मारली. इ.स. 1705 साली पुन्हा खंडेराव दाभाडे यांनी काठेवाड व सोरठपर्यंत मजल मारली. यावेळी त्यांचा मदतनीस त्यांच्या हाताखालील सरदार दमाजीराव गायकवाडा होता.

या गायकवाड घराण्याचे मुळ नाव मत्रे होय. पण या घराण्यातील नंदाजीराव याने वाघाच्या तडाख्यात सापडलेली एक गाय सोडवून आपल्या घराच्या कवाडाच्या आड सुरक्षित ठेवली म्हणून तेव्हापासून या घराण्याला गायकवाड असे नाव मिळाले. या गायकवाडांचे मुळ गाव भरे, तालुका हवेली, जिल्हा पुणे. नंदाजीरावाचा पुत्र दमाजीराव पराक्रमी होता. त्याने शाहू महाराजांचे तत्कालीन सेनापती खंडेराव दाभाडे यांच्याकडे नोकरी केली. 10 ऑगस्ट 1720 रोजी निजाम व सय्यद बंधू यांच्यातील शत्रूत्वामुळे जी एक लढाई वऱ्हाडप्रांतातील बाळापूर या ठिकाणी झाली या लढाईत दमाजींचा पराक्रम नजरेस आला. हे दमाजीराव गायकवाड घराण्यातील पहिले प्रसिध्द पुरूष होत.

दमाजी–रावांच्या भावाचा मुलगा पीलाजीराव हे सुध्दा त्रिंबकराव दाभाडेकडे नोकरीला राहिले. तेही खूप पराक्रमी होते. पिलाजीरावाचे पागा सांभाळण्याचे कौशल्य लक्षात घेवून त्यांना दाभाडे यांनी पागेची सनद करून दिली. पिलाजीरावांनी सोनगड नावाच्या डोंगरी किल्ल्याच्या आश्रयाने आपले स्थान मजबूत केले. त्यामुळे दाभाडेंना त्यांची असूया वाटू लागली. अशा परिस्थितीत पिलाजीचा कारभारी बसोलींगदेव याने स्वतंत्र संस्थान स्थापन करण्याचा सल्ला दिला. यामुळे पिलाजींच्या मनात स्वातंत्र्याची भावना जागृत झाली. पण त्यांच्या या प्रयत्नाला त्यांचा प्रतिस्पर्धी कंठाजी कदमबांडे याने तीव्र विरोध केला. यांच्यातील विरोध निजामाने शांत केला व त्यांच्या मदतीने गुजराथ प्रांतात चौथ सरदेशमुखी वसूल केली. या वसूलीत पिलाजीरावाचे पारडे जड राहिले. त्यामुळे पुढे शाहू महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे कदमबांडे यांनी पिलाजीरावाचे ताबेदारीने राहावे. अशी सेनापतींनी आज्ञा केली. यामुळे पीलाजीरावांचा दर्जा वाढून, त्यांचे वर्चस्व गुजराथमध्ये कायम झाले. इ. स. 1732 मध्ये पिलाजीरावाची हत्या झाल्यानंतर त्यांचा द्वितिय पुत्र दमाजीराव याने गायकवाडांचे राज्य स्वतंत्र करून त्याचा पुढे पुष्कळ विस्तार केला. हळूहळू गुजराथमधील दाभाडयांची सत्ता नष्ट होत गेली व गायकवाडांची सत्ता स्थिर झाली. पुढे माधवराव पेशव्यांच्या काळात दमाजी गायकवाड यांनी निजामाच्या विरोधात काढलेल्या मोहिमेत खूप पराक्रम केला. त्यामुळे पेशव्यांनी गायकवाडांना सातारच्या छत्रपतीकडून 'सेनाखासखेल' ही पदवी व पोषाख देवविला. त्याचप्रमाणे 21/3/1763 च्या सनदेत थोरले माधवराव पेशवे यांनी दमाजीरावांना पाटण, विजापूर, शमी, मुंजपुर, वडनगर, विसनगर, सिध्दपूर, खेराळू व राधनपूर हे परगणे फौजेच्या सरंजामासाठी दिले. दमाजीरावांच्या कारकीर्दीत गायकवाडांचे राज्य गुजराथेत दृढमूल झाले. हे दमाजीराव गायकवाड वयाच्या 69 वर्षी मृत्यू पावले. दमाजीरावांच्या दुरदृष्टीच्या शासनामुळेच बडोद्याची गणना स्वतंत्र संस्थानिक म्हणून होवू लागली.

दमाजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या 4 मुलांमध्ये सत्तास्पर्धा निर्माण झाली. शेवटी इ.स. 1771 साली पहिले सयाजीराव यांना बडोद्याचे शासक म्हणून मान्यता मिळाली. पण यांचा लवकरच 1778 मध्ये मृत्यू झाला. त्यामुळे फत्तेसिंह गायकवाड यांना सत्ता मिळाली. यांनी इ.स. 1789

**Please cite this Article as :** *सुनीता सरायकर, बडोदा संस्थानचे महाराजा श्रीमंत सयाजीराव महाराज तृतिय यांच्या शैक्षणिक योगदानाचा विश्लेषणात्मक इतिहास*: **Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)**

पर्यंम म्हणजे अकरा वर्षे राज्य केले. इ.स. 1789 मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यामुळे मानाजीरावास सत्ता मिळाली पण यांचेही लवकरच 1793 साली मृत्यू झाल्यामुळे पहिल्या दमाजीरावांचे द्वितिय पुत्र गोविंदरावास सत्ता मिळाली. यांनी इ.स. 1800 पर्यंत राज्य केले. गोविंरावानंतर त्यांचा औरस मुलगा आनंदराव राज्य करण्यास असमर्थ असल्यामुळे अनौरस मुलगा कान्होजीने राज्य बळकावले. पण बडोद्याचे कारभारी रावाजी अप्पाजी याने इंग्रजांच्या मदतीने कान्होजीचा पराभव केला. येथूनच बडोदे राज्याच्या कारभारात इंग्रजांचा प्रवेश झाला व इ.स. 1819 पर्यंत बडोदे राज्यात मुंबई सरकारचीच फर्माने चालू राहिली. आनंदराव नाममात्र शासक होते. यांचा मृत्यू 2 ऑक्टोबर 1819 मध्ये झाल्यानंतर दुसरे सयाजीराव महाराज यांचे शासन एकंदर 28 वर्षे चालले. सयाजीरावांचा मृत्यू 1847 साली झाला. पण यापुर्वी त्यांनी इंग्रजांशी सतत वाद घालून राज्यात सुव्यवस्था लावून घेतली. सयाजीराव द्वितिय यांचे नंतर त्यांचे पुत्र गणपतराव इ.स. 1856 पर्यंत राज्याधिकारी राहिले. गणपतरावांना संतती नसल्यामुळे त्यांचे धाकटे बंधू खंडेराव सत्ताधारी बनले. खंडेराव सत्यप्रिय, दयाळू, निर्वसनी होते. मद्यपी व लबाड लोक त्यांच्या समोर जाण्यास भीत असत. खंडेराव महाराजांचा मृत्यू 28 नोव्हेंबर 1870 रोजी झाला. यानंतर राज्याला योग्य वारसदार मिळाला नाही. त्यामुळे इंग्रजांनी महाराणी जमनाबाईसाहेब यांना दत्तक घेण्याची परवानगी दिली.

दुसऱ्या दमाजीराव गायकवाड यांचे बंधु प्रतापराव भाऊबंदकीमुळे गुजराथ सोडून खानदेशात पाटीलकीचे वतन करू लागले. त्यांच्या वंशातील चौथ्या पीढीत काशीराव व त्यांचे चार बंधू तेथे वास्तव्यास होते. काशीराव यांचे सुपूत्र गोपाळराव हेच पुढे सयाजीराव तृतीय म्हणून ओळखले जावू लागले. यांनाच जमनाबाईसाहेब यांनी बडोद्याचे शासक म्हणून नियुक्त केले. 27 मे 1875 साली त्यांचा राज्यभिषेक झाला. यावेळी त्यांचे वय फक्त 12 वर्षाचे होते. म्हणून महाराणी जमनाबाईसाहेब यांना अज्ञानाची पालकर्ती म्ळणून इंग्रजांनी मान्यता दिली.

सयाजीराव महाराज तृतीय यांच्या जीवनप्रवाहाचे तीन टप्प्यात वर्गीकरण करता येते. त्यांचा पहिला टप्पा 1875 ते 1887 या काळातला होय. या काळात त्यांनी राज्याधिकार, राज्याची संपूर्ण माहिती व राज्यकार्य कौशल्य प्राप्त करून घेतले. याच काळात त्यांनी जगाचा परिचय करून घेण्यासाठी विदेशवारीसुध्दा केली.

1887–1911 पर्यतच्या दुसऱ्या 24 वर्षाच्या टप्प्यात त्यांनी अनेक अखिल भारतीय प्रश्नात सहभाग घेवून आपल्या कर्तृत्वाने व देशप्रेमाने सर्व हिंदूस्थानभर आपले कार्य व्यापले.

1911–1935 या 23 वर्षाच्या कालावधीत त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या कक्षा अधिकच विस्तारीत केल्या व जगात बडोद्याचे नाव अजरामर केले.

राजकारणी पुरूषाला आवश्यक असणारी सखोल बुध्दिची देणगी सयाजीरावांना प्राप्त झालेली होती. त्यामुळे प्रजेची बौध्दिक उन्नती झाली पाहिजे याकडे महाराजांनी विशेष लक्ष पुरविले. आरंभापासून शिक्षणखाते महाराजांचे अत्यंत आवडते खाते होते. सन इ.स. 1881 साली त्यांनी बडोदे कॉलेजची सुरवात केली. प्रथम या कालेजमध्ये फक्त ‘आर्टस्’ हा कोर्स शिकविण्याची व्यवस्था केली होती. यानंतर सहा मुख्य तालुक्याच्या ठिकाणी इंग्रजी व देशी भाषा शिकविणाऱ्या शाळा स्थापन करण्यात आल्या.

रयतेच्या कल्याणाच्या बाबतीत शिक्षण ही अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यामुळे शिक्षणाची दिशा विचारपूर्वक ठरवून तिचा विस्तार शहाणपणे केला पाहिजे. शिक्षण कोणत्या प्रकारचे दिले जावे, ज्या शिक्षणाने परिपक्वता निर्माण होईल. अज्ञानी माणसास ज्ञानी करण्याचे कर्तव्य राज्याचे आहे. प्रजेच्या शारिरिक सुखाप्रमाणे नैतिक व बौध्दिक सुधारणेकडे धर्मपिता या न्यायाने राजाने अवश्य लक्ष दिले पाहिजे. सरकारचे नेतृत्व नसेल तर शिक्षणाकडे प्रजेचे प्रयत्न होणार नाही. देशाच्या अनिष्ठ स्थितीस शिक्षण हीच संजीवनी आहे. त्यामुळेच रयतेस शिक्षण फुकट देण्याची योजना सरकारकडून करण्यात आली. विद्या दानात जो यशस्वी होईल तोच देशाचा खरा उध्दारक समजला जाईल असे महाराजांचे मत होते.

प्राथमिक शिक्षणास प्राधान्य दिले पाहिजे. जेणे करून सर्वसामान्य वर्गाला अक्षर ओळख होईल. याच बरोबर व्यावहारिक शिक्षण दिले गेले पाहिजे. शिक्षणामुळे विद्यार्थ्याची मने सुसंस्कृत होवून त्यांच्या बुध्दित प्रगल्भता यावी व त्यांचे आचार विचार सुसंस्कृत व्हावेत हेच अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी इतरांशी चांगले वागावे यासाठी त्यांना प्रशिक्षण देणारे शिक्षक चांगले असावे त्यामुळे विशेष प्रशिक्षित शिक्षकांना विद्यादानाच्या कार्यासाठी नियुक्त केले जावे जेणेकरून उत्तम नागरीक शिक्षणाच्या माध्यमातून घडविले जातील. म्हणून प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष महाराजांनी दिले.

महाराजांनी मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाचीही सोय केली. इ.स. 1882–83 या वर्षी महाराजांनी अस्पृश्य गणलेल्या लोकांसाठी स्वतंत्र शाळा सूरू केल्यात. या लोकांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करून त्यांना पाटया, पुस्तके व अन्य शैक्षणिक साधने पुरविण्याचा हुकूम देण्यात आला. आदीवासी भिल्लांसाठी महाराजांनी स्वतंत्र वसतीगृहाची सोय केली.

सन 1882–83 या वर्षी सरदारांच्या मुलांसाठी विशेष शाळा उघडली ज्यात लिहिणे, वाचणे, गणित, इतिहास, भुगोल या विषयांचे अध्यापन मातृभाषेत दिले जात असे. या शिवाय लष्करी शिक्षण व खेळांचे शिक्षण देण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. व्यावहारिक शिक्षणाप्रमाणेच औद्योगिक शिक्षणाचा विचार करण्यात आला. देशातील उद्योगधंदाच्या सुधारणेसाठी परदेशात विद्यार्थी पाठविणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षणासाठी सरकारकडून अर्थसहाय्य पुरविले जावे. पण त्याचबरोबर विद्यार्थ्यानी परिश्रमाची सवय ठेवावी व ज्यांना ज्या उद्योगाची आवड आहे त्यांना त्याच प्रकारचे शिक्षण ग्रहण करण्यासाठी पाठवावे. परेदशीय शिक्षणाने ज्ञानात सखोलता यावी व कौशल्य प्राप्त व्हावे याचा विचार विद्यार्थ्याना पाठवितांना केला जावा असे महाराजांचे धोरण होते.

स्त्रिया समाजाचे प्रधान अंग असल्याने त्यांच्या शिक्षणाबद्दलची आस्था त्यांनी आरंभापासून बाळगली होती. म्हणून स्त्रियांच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. मुलींच्या शाळेत व्यवहारोपयोगी व जीवनावश्यक अशा कलांचे शिक्षण दिले जाई. कलात्मक शिक्षण देण्यासाठी सन 1886 साली बडोद्यास गायन शाळेची स्थापना केली गेली. याच वर्षी प्रौढ स्त्रियांना साक्षर करण्यासाठी निराळे वर्ग काढण्यात आले. आदीवासी मुलींसाठी सोनगड येथे मुलींची शाळा स्थापन करण्यात आली.

इ.स. 1885 साली महाराजांनी आपला शिक्षण विकासाचा कार्यक्रम जाहीर केला.

1) प्रतिवर्षी तीस नव्या शाळा उघडाव्या.
2)दरवर्षी शाळांच्या इमारतीसाठी साठ हजार रूपये खर्च करण्यात यावेत.
3)प्रत्येक विभागातील मुख्य शाळेला जोडून अभ्यासक्रमातील पुस्तकात उल्लेख केलेल्या वस्तूंचे संग्रहालय असावे.
4)स्त्री शिक्षणाच्या प्रगतीकडे अधिक लक्ष देण्यात येवून मुलींच्या शाळेत स्त्रीशिक्षिकांची नियुक्ती करण्यात यावी.
5)तळागाळातील व्यक्तींपर्यंत शिक्षण पोचवण्याचा प्रयत्न केला गेला जावा.
6)विद्यार्थ्यांच्या नैतिक व शारिरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यात यावे.
7)औद्योगिक शिक्षणाच्या शाळा सुरू कराव्यात.
8)विद्यार्थ्यांसाठी नवीन वाचन पुस्तकमाला तयार करण्यात यावी.
9)इंग्रजी भाषेतून देशी भाषेत भाषांतरे करण्याची तजवीज केली जावी.
10)षक्य तेथे वाचनालयाची सोय केली जावी.

या कार्यक्रमानुसार महाराजांनी कार्य केले. त्याचप्रमाणे विद्वान व कीर्तीवान लोकांचे स्मरण सतत राहावे यासाठी कीर्तीमंदिर बांधण्यात यावे व तेथे दरवर्षी व्याख्यानमालेचा कार्यक्रम करावा, असे घोषित केले.

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, पं. मदनमोहन मालवीय या सर्वांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देणारे म्हणून सयाजीराव महाराज ओळखले जातात. ते लेखक आणि प्रकाशकांचे पोशिंदे होते. एकंदर 392 ग्रंथांचे प्रकाशन बडोदा संस्थानाने केले. गो. स. सरदेसाई 37 वर्षे बडोदा संस्थानात रीडर व मुलांचे शिक्षक होते. मराठी रीयासती या ग्रंथमालेची निर्मिती सयाजीराव महाराजांच्या आर्थिक आश्रयामुळेच झाली. ज्या महान व्यक्तींना सयाजीरावांनी शिक्षण घेण्यास मदत दिली त्यांनी पुढे राष्ट्राच्या निर्मितीत अमुल्य योगदान दिले. अशा रीतीने सेवाकार्याचा वारसा त्यांनी सयाजीरावांकडून घेतला आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

1) भागवत, अ. ना. ; श्री. भोसले सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र–भाग 1, 2.
2) देव, बळवंतराव ; श्री. मल्हारराव गायकवाड यांचा खरा इतिहास.
3) बापट ना. वि. ; श्री. महाराणी जमनाबाईसाहेब यांचे चरित्र
4) सरदेसाई ; श्री. सयाजीराव गायकवाड यांचा खासगी व कौटूंबिक वृत्तात.
5) श्री सयाजी गौरवग्रंथ. गायकवाडांची हकीकत
6) बखर सरकारी दप्तराखात्यामार्फत प्रसिध्द झालेली.
7) बडोदे राज्याच्या दप्तरातील ऐतिहासिक वेचे, भा.1.
8) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, मध्य विभाग, भा. 2
9) Baroda Gazetteers, Vol 1.
10) Sayaji Rao the III Vols. 1, 2, by Stanley Rice.
11) The Ruler of Baroda by, Sergeant.
12) आपटे, दा. ना. ; श्री. सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे चरित्र, खंड 1, 2, 3

---

[1] आपटे, द. ना. श्री. महाराज सयाजीराव गायकवडा (तिसरे) यांचे चरित्र; प्र. आ. 1936, पृ. 4.
[2] श्री. स. म. तृ. यांचे चरित्र, पृ. 4
[3] कित्ता, पृ. 5.
[4] बखर, गायकवाड यांची हकीकत, पृ. 1
[5] चिपळूणकर, अ. अ., अभिनव सयाजी, पृ. 32.
[6] श्री. स. गा. यांचे च. पृ. 8.
[7] सरदेसाई, गो. स.; मराठी रिसायत मध्य विभाग–1, पृ. 223.
[8] बखर, गायकवाड यांची हकीकत, पृ. 4
[9] बडोदे राज्य दप्तरातील ऐतिहासिक वेचे, भाग–1, पृ. 101.
[10] कित्ता, पृ. 95.
[11] श्री. स. गा. तृ. यांचे चरित्र खंड–1, पृ. 18.
[12] मराठी रिसायत, मध्यविभाग, भा–2, पृ. 318.
[13] श्री. स. गा. तृ. यांचे च. खंड 1, पृ. 20.
[14] Baroda Gazetteer, Vol. 1, Pgs. 429-430.
[15] स. गा. तृ. यांचे च. खंड 1, पृ. 39.
[16] बापट, ना. वि., जमनाबाईसाहेब यांचे चरित्र, पृ. 13–14.
[17] स. गा. तृ. या. च. खंड 1, पृ. 105.
[18] कित्ता, पृ. 133.
[19] कित्ता, पृ. 127.
[20] स. गा. तृ. या. च. खंड 1, पृ. 353.
[21] स. गा. तृ. या. च. खंड 1, पृ. 1252.
[22] स. गा. तृ. या. च. खंड 1, पृ. 1255.
[23] कित्ता, पृ. 358.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net